# PAWAR PUBLIC SCHOOL, BHANDUP

| Class | Subject | Exam | Marks | Date | Time | No. of printed sides |
|---|---|---|---|---|---|---|
| X | Marathi | Second Prelim | 80 | 03.01.19 | 3 hrs | 5 |

**Answers to this paper must be written on the paper provided separately.**
You will not be allowed to write during the first 15 minutes.
This time is to be spent in reading the question paper.
**The time given at the head of this paper is the time allowed for writing the answers.**

---

This paper comprises of two sections: **Section A** and **Section B.**
Attempt **all** the questions from Section A.
Attempt **four** questions from Section B, answering at least **one** question each from the two books you have studied and any two other questions.
The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ]

---

## SECTION A (40 Marks)

Attempt all questions

**Question 1**

Write a short composition in Marathi of approximately 250 words on any **one** of the following topics. **[15]**

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 250 शब्दांत मराठीत संक्षिप्त निबंध लिहा.


**(i)** आपणा प्रत्येकाच्या जीवनात कोणी न कोणी असा शिक्षक वा शिक्षिका येते की अभ्यासाकडेच काय पण आपल्या जीवनाकडे पाहण्याचा आपला सारा दृष्टिकोनच बदलून टाकते. तुमच्याही आयुष्यात असेच कुणी आलेले असेल. त्या शिक्षक/शिक्षिकेविषयी, त्यांचे व्यक्तिमत्त्व, शिकवण्याची पद्धत, वेगळेपण, गुणवैशिष्ट्ये या साऱ्यांविषयीचे अनुभवलेखन करा.

**(ii)** 'मानव श्रेष्ठ की निसर्ग श्रेष्ठ! यावर तुमचे साधक-बाधक विचार मांडा.

**(iii)** भारताच्या उज्ज्वल प्रगतीसाठी आज देशाला योग्य नेतृत्वाची गरज आहे. कल्पना करा.. तुम्हीच या देशाचे पंतप्रधान झालात तर! देशाच्या भल्यासाठी काय..काय व का कराल? त्याने कोणते परिणाम साधतील.. आपले विचार शब्दबद्ध करा.

**(iv)** 'कष्टाशिवाय फळ मिळत नाही'-हे विधान उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट करा किंवा त्यावर आधारित गोष्ट लिहा.

**(v)** पुढे दिलेले चित्र पहा व त्याआधारे आपल्या मनात कोणते विचार येतात - त्याचे वर्णन करा किंवा त्यावर आधारित गोष्ट लिहा.



Contd.......

Scanned by CamScanner

**Question 2**

Write a letter in **Marathi** of approximately **120** words on any one of the topics given below:- [7]

खालील दिलेल्या विषयापैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 120 शब्दांपर्यंतचे पत्र मराठीत लिहा.

(i) काही कारणानिमित्ताने नुकतीच आपण एका खेडेगावास भेट दिलीत. तेथील आदिवासींचे जीवन जवळून पाहिलेत. शहरी जीवनातील सुखदु:खांपेक्षा त्यांची सुखदु:खे फार वेगळी असल्याचे जाणवले. त्यांच्यासाठी काही करावे अशी योजनाही तुम्हाला सुचली ते सारे पत्राद्वारे आपल्या ताईस कळवा.

(ii) आपण काही मुलांनी सामाजिक जबाबदारी म्हणून 'प्लॅस्टिक पिशवी बंदी' मोहीम आखली आहे. आपल्या शाळेतील सर्व विदयार्थ्यांनी 'प्लॅस्टिक पिशवी बंदी चळवळीत' सहभागी होण्यासाठी परवानगी मागणारे व आपल्या मोहिमेची माहिती देणारे पत्र 'विदयार्थी प्रतिनिधी' या नात्याने शाळेच्या मुख्याध्यापकांस लिहा.

**Question 3**

Read the passage given below and answer in **Marathi** the questions that follow, using your own words as far as possible:-

खालील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वतःच्या शब्दांत मराठीत लिहा.

एका घनदाट जंगलात एक सिंगरी नावाचा तलाव होता. त्या तलावात भरपूर रंगीबेरंगी मासे राहत असत. त्यात एक सोनेरी रंगाची मासोळी राहत होती. तिचा रंग सोन्यासारखा होता म्हणून तिला सर्व 'सुनहरी' हाक मारत असत. त्याच तलावात एक बेडूक पण राहत असे. त्याचे नाव फटू होते. फटू कधी जमिनीवर बसत असे तर कधी पाण्यात उडया मारत असे.

एके दिवशी फटू सुनहरीजवळ आला आणि म्हणाला, "सुनहरीताई,मला तुझ्यासारखे पोहायला शिकायचे आहे. तू मला पोहायला शिकवशील का?" सुनहरी म्हणाली, "हो हो ! का नाही? तू उदया सकाळीच ये."

दुसऱ्या दिवशी फटूने पाण्यात उडी मारली. सुनहरीने त्याला पोहायला शिकवायला सुरूवात केली. असेच एक दोन दिवस गेले. फटूचा जीव गुदमरून गेला. त्याने विचार केला, पहाटे कोण उठणार? रोज रोज तो पोहण्याचा सराव किती करणार?जेवढे आता येते तेवढेच ठीक आहे. म्हणून यापुढे तो सुनहरीकडे गेलाच नाही.

थोडया दिवसांनी फटूने आकाशात पक्ष्यांना उडताना पाहिले. आता त्याला आकाशात उडावेसे वाटू लागले. तेवढयात तिथे एक चिमणी आली. फटूने तिला विचारले, "चिमणीताई , मला तू तुझ्यासारखे उडायला शिकवशील का ?" चिमणी म्हणाली, "हो! का नाही ? उदया सकाळपासून तू यायला लाग." दुसऱ्या दिवशी उत्साहाने फटू चिमणीकडे गेला. पुढे दोन तीन दिवस उडण्याचे प्रयत्न चालू होते,परंतु तो जास्त उंच उडू शकत नव्हता, पण त्याला लांब उडया मारायला येऊ लागल्या. फटूला आता उडया मारण्याचाही कंटाळा येऊ लागला. चिमणी फटूची वाट पाहत होती; मात्र फटू चिमणीकडे गेलाच नाही. चिमणी नाराज झाली.

चिमणी म्हणाली, "कोणतेही नवीन काम कष्ट,सराव आणि अभ्यासानेच शिकता येते. इच्छा असूनही फटू काहीच शिकला नाही."

प्रश्नः

(i) फटू कोण होता? त्याने सुनहरीपुढे कोणता प्रस्ताव ठेवला? का? [2]

(ii) सुनहरीची या प्रस्तावावर कोणती प्रतिक्रिया होती ? तिच्या प्रयत्नांना कितपत यश मिळाले?का? [2]

(iii) फटू इच्छा असूनही कोणत्या दोन गोष्टींपासून वंचित राहिला? का? [2]

(iv) 'कोणतेही नवीन काम कष्ट,सराव व अभ्यासानेच शिकता येते-' हे विधान तुम्हास पटते का?- उदाहरणासह स्पष्ट करा. [2]

(v) तुमचाही जीवनात कधी न कधी 'फटू' झाला असेल. का? कसा? व त्यावर मात केलीत का? कशी?- थोडक्यात मांडा. [2]

Contd.......

Scanned by CamScanner

**Question 4**

Answer the following according to the instructions given:-

खाली दर्शविल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहा.

i) खालील म्हणींचा वाक्यात उपयोग करा. (कोणतीही एक) [1]

a) झाकली मूठ सव्वा लाखाची b) दिव्याखाली अंधार c) घरोघर मातीच्या चुली

ii) खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणताही एक) [1]

a) शहानिशा करणे b) नाकी नऊ येणे c) पड खाणे

iii) रिकाम्या जागी योग्य अव्यय भरून वाक्य पुन्हा लिहा. [2]

a) ......... ! किती धवधवीत यश मिळवलेस!

b) स्वत: ........... स्वच्छतेची सुरूवात करावी.

c) आजपासून मी सायकल ........... चालवणार.

d) शोधा ...........सापडेल.

iv) खाली देण्यात आलेल्या शब्दांपैकी कोणत्याही दोन शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [1]

a) गिरी b) वसुंधरा c) तलाव d) वारा

v) पुढील शब्दसमूहासाठी योग्य शब्द लिहा. [1]

a) हृदयाला भिडणारे b) राष्ट्राराष्ट्रांतील

vi) यंत्रमानव हा केवळ सांगकाम्या आहे. (वाक्यप्रकार ओळखा.) [1]

vii) अभ्यास केला तेव्हा पास झालात. (भविष्यकाळ करा.) [1]

DEPOT
Shop No. ... Vasant Utsav,
Thakur Village, Kandivali (E),
Mumbai - 400 101.
Mob. 9821253050.

## SECTION B (40 Marks)

Questions from only **two** of the following textbooks are to be answered.

Attempt **four** questions from this section.

You must answer at least one question from each of the two books you have studied and any **two** other questions from the same books that you have chosen.

(कथाकुंज)

**Question 5**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow:-

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.

सकाळी उठल्यावर क्षणभर त्यांना वाटले. "हरिभाऊ आता गाई-म्हशींची धार काढून आला असेल, शारदा घरात घुसळण करीत असेल !" परंतु कालच्या प्रसंगाचे स्मरण होताच त्यांच्या मनात धस्स झालं.... कुशाबापू विलक्षण उदास झाले.

महाजनांचा वाडा म्हणजे साऱ्या गावाला भूषण होतं. रीत पहावी तर महाजनांच्या घरची असं लोक आदराने म्हणत. गोविंदनानांनी आदर्शच तसा घालून दिला होता.

(i) गोविंदनानांनी इस्टेटीची वाटणी कशी केली? का? त्याचा परिणाम काय झाला? [2]

(ii) हरी व कुशाबापू कोण होते? त्यांचे आपापसातील नाते आधी कसे होते? [2]

(iii) कुशाबापूला आपल्यापासून दूर करण्यासाठी हरीने कोणकोणते प्रयत्न केले ? [3]

(iv) अंगणातील भिंत का उभी राहिली ? तिने महाजनांच्या वाड्यात कोणते नाट्य घडवले? [3]



Scanned by CamScanner

**Question 6**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow:-
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.

.....तुला अशी रडत बघून मी बाहेर पडू होय?"
सईला हे सगळे बोलताना नेहमीसारखे कष्ट झाले. निरूपमाने डोळे ओले करायला सुरूवात केली की,सईला असेच नेहमी अवघडून जायचे; पण हे अवघडणे लवकरच जाईल, सवयीचे होईल याची सईला खात्री होती.

निरूपमाचे आयुष्य अगदी लहान वयातच संपून गेल्यासारखे झाले हे खरे.

(i) निरूपमाने सगळी दुपार कशी घालवली? का? [2]
(ii) दुपार सरताना निरूपमा पुलकित का झाली? [2]
(iii) निरूपमाचे आयुष्य लहान वयातच संपून गेल्यासारखे का झाले होते ? [3]
(iv) निरूपमाच्या या दु:खास तीच जबाबदार होती असे आपणास वाटते का?स्पष्ट करा. [3]

**Question 7**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow:-
खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.

कशाला . . या . . वयात इतकी धडपड करतेस तू? पण जन्मभर त्या धडपडच करत आल्या होत्या. तरूण वयात वैधव्य आले. दोन मुलांची जबाबदारी अंगावर होती. ती मोठी होत असताना काय करावे लागले नाही? पण त्याचे फळही मिळाले. मुले हुशार निघाली. दोघांनी वेगवेगळया क्षेत्रांत नाव मिळवले. एक कीर्तिवंत झाला तर दुसरा श्रीमंत . .

(i) 'कशाला या वयात धडपड करतेस ?' असे कोण, कोणास व का म्हणाले? [2]
(ii) शारदाबाईची दिनचर्या कशी होती? [2]
(iii) शरद कोण होता? त्याच्या सुखी-समृद्ध संसाराचे चित्रण लेखिकेने कसे केले आहे? [3]
(iv) शारदाबाईना कृतकृत्य झाल्यासारखे केव्हा व का वाटले? [3]

(काव्यांगण)

**Question 8**
Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow:-
खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.

माझा मराठीचा बोल
वाजे काळजात खोल
ओवीमधून पाझरे
निळया अमृताची ओल

(i) 'मराठी माऊली' असे कवी कोणाबाबत म्हणत आहेत? तिला कोणीकोणी व कसे फुलवले आहे? [2]
(ii) 'गुलाल' व 'अबीर' या प्रतिमांतून मराठी माऊलीची कोणकोणती वैशिष्टये तुम्हाला जाणवतात? [2]
(iii) 'मराठी माऊली' विषयक कवीच्या मनात गर्व आहे- विधान स्पष्ट करा. [3]
(iv) प्रस्तुत कवितेतील तुम्हाला आवडलेली ओळ कोणती? का ? स्पष्ट करा. [3]

**Contd......**

Scanned by CamScanner

**Question 9**

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow:-

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.

वर्षामागून वर्षे गेली
संसाराचा सराव झाला
नवा कोरा कडक पोत
एक मऊपणा त्याला

(i) कवयित्रीने आजीची पैठणी कोठे ठेवली होती? त्या पैठणीची वैशिष्ट्ये कोणती? [2]

(ii) पैठणीस ओळखीची . . अनोळखीची गूढ जाणीव आहे असे कवयित्री का म्हणते? [2]

(iii) पैठणीने कोणते तन-मन जपले ? कसे ? [3]

(iv) 'नवा कोरा कडक पोत एक मऊपणा त्यांला' या पंक्तीतून सूचित होणारा अर्थ स्पष्ट करा. [3]

**Question 10**

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow:-

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.

देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे ।

(i) माळ व सहयाद्रीच्या कडयाकडून नेमके काय घ्यावे असे कवी सुचवितो ? [2]

(ii) ढग व पृथ्वी यांच्याकडून काय घ्यावे?का? [2]

(iii) कवी देणाऱ्याकडून काय काय घ्यावे असे आपणास सांगत आहेत? [3]

(iv) 'देणाऱ्याचे हात घ्यावे' या पंक्तीतून तुम्हाला जाणवणारा भावार्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. [3]

xxxxxxxxxxxxxxx

... BOOK DEPOT

Scanned by CamScanner